कॅनेडियन हीरो

# टेरी फॉक्स

## कर्करोगाशी दिलेली झुंज!




मराठी : गार्गी लागू





# टेरी फॉक्स

टेरी फॉक्स..बेट्टी आणि रोल्ली यांनी आपल्या मुलाचे ठेवलेले नांव! टेरेन्सचा जन्म 28 जुलै 1958 रोजी विनिपेंग, मनिटोबामधे झाला. टेरीची पहिली 8 वर्ष जन्मगावीच गेली. मोठा भाऊ फ्रेड, लहान भाऊ डेरेल, आणि सगळ्यात धाकटी बहिण ज्यूडिथ यांच्याबरोबर हसत खेळत तो मोठा होत होता. घरात आनंदी वातावरण होते. वडील रोल्ली कॅनेडिअन रेल्वेमधे स्विचमन होते. आई बेट्टी घरीच मुलाकडे लक्ष देत होती.

टेरी आपल्या भावाबरोबर क्योअता प्राथमिक शाळेत जात होता. शाळा त्याला आवडत होती पण खरी मजा त्याला घराच्या मागे असलेल्या मोठ्या मैदानात खेळण्यात येत होती. थंडीच्या दिवसांमधे तर आणखीनच मज्जा यायची. घराच्या भिंतीजवळ खूप बर्फ जमा व्हायचा आणि त्यावरून घसरायला दोनही भावांना खूप आवडायचे.

**फॉक्स परिवार :** आई,वडील, टेरी (वय वर्षे 10), फ्रेड (11 वर्षे), ज्यूडिथ (3 वर्षे) आणि डेरेल (6 वर्षे)




टेरी (वय वर्षे 9) बेसबाल ट्राफीसह 1971 मधे सॉकर टीम बरोबर.

टेरीचा निश्चयी स्वभाव आणि जिंकण्याची जिद्द लहानपणापासूनच लक्षात आली होती. एकदा सहलीला गेला असतांना सॉफ्ट बॉल खेळता-खेळता त्याच्या नाकातून अचानक रक्तस्त्राव सुरू झाला. त्याला हास्पिटलमधे घेऊन जावे लागले. पण तिथून परतल्यावर परत खेळ सुरू.....रक्तस्त्रावाचा त्याच्या खेळण्यावर काही परिणाम झाला नाही.

1966 मधे फाक्स परिवार पोर्ट कोकुएटलम, ब्रिटिश कोलंबिया येथे रहायला आला. तिथे ग्लेन प्राथमिक शाळेत, नंतर मेरी हिल ज्यूनिअर माध्यमिक शाळेत शिकला. तसा तो अभ्यासात फार हुशार नव्हता. पण खूप मेहेनत करून त्याने चांगले गुण मिळविले. तिथे त्याला 'दौग अल्वार्ड' नावाचा नवा मित्र मिळाला. दोघे मिळून रग्बी, बेसबाल, आणि साकर खेळायचे. लांब पल्ल्याच्या शर्यतीत दोघे एकदुसर्याला हरविण्याच्या जिद्दीने भाग घ्यायचे.

टेरीला खरे तर बास्केटबाल खेळामधे भाग घ्यायचा होता. पण त्यासाठी खूप जास्त सराव करण्याची आवश्यकता होती. शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा सुटल्यावर टेरी सराव करू लागला. टेरी आणि दौग दोघे 'वन टु वन' किंवा '21' खेळत असत. १०वी मधे दोघांना शाळेच्या बास्केट बॉल टीममधे निवडले गेले. दौग सांगतो, 'टेरीचा सर्वात आवडता शाट म्हणजे ' स्पिन-ए -रामा'! संरक्षणात्मक खेळी हे टेरीच्या खेळाचे वैशिष्ट्य होते. ' स्नातक पदवी मिळतेवेळी, टेरी व दौग दोघांना "ॲथलेट आफ द इयर" पुरस्कार विभागून मिळाला.

1976 मधे टेरी फॉक्स साइमन फ्रेजर महाविद्यालयात दाखल झाला. तिथे त्याचा विषय होता, " कइनीसिओलाजी" अर्थात शरीराची हालचाल कशी होते याचा अभ्यास! त्याचवर्षी नोव्हेंबर महिन्यात त्याच्या उजव्या गुढग्याला गाडीबरोबर झालेल्या टक्करीमुळे जबरदस्त दुखापत झाली. दुखण वाढतच गेले. उन्हाळ्यापर्यंत तर ते सहन करण्यापलिकडे गेले. त्याचे वडील त्याला कोलंबिअन हास्पिटल, न्यू वेस्ट मिनिस्टर येथे घेऊन गेले. तिथे 'क्ष' किरण तपासणी, रक्त तपासणी, आणि हाडांचे स्कॅनिंग करण्यात आले. डाक्टरांनी सर्व तपासण्यावरून निदान केले तेव्हा टेरीचा सर्व परिवार त्याच्या सोबत होता. टेरीला आस्टिओर्गेनिक सारकोमा, म्हणजे एक प्रकारचा हाडाचा कर्करोग झाला होता. जीव वाचविण्यासाठी पाय लवकरात लवकर कापून टाकण्याची आवश्यकता होती.

सुरवातीला वाटले की ही वाईट बातमी ऐकल्यावर टेरी दु:खाने वेडापिसा होईल. पण टेरी खूपच हिंमतीने परिस्थितीला सामोरा गेला. एक पाय गेला म्हणून काय झाले, आपली हिंमत कमी होऊ द्यायची नाही. पुढे 6 दिवसांनी टेरीचा पाय कापण्यात आला.

शस्त्रक्रियेच्या आदल्याच दिवशी टेरीने एक लेख वाचला होता. एक पाय असलेल्या "डीक ट्राम" नावाच्या धावपटू विषयी तो लेख होता. त्याने आपल्या एका पायावर न्यू-यार्क सिटीमधील मॅरेथान स्पर्धा धावून पूर्ण केली होती. ती वाचून टेरीने मनांत ठरवून टाकले की आपण पण डिक ट्रामसारखे कॅनडा मॅरेथान स्पर्धेत धावायचे आणि कर्करोगावर संशोधन करण्यासाठी निधी गोळा करायचा.

एक महिन्यानंतर टेरी घरी आला. कुबडीच्या सहाय्याने तो चालू शकत होता. हास्पिटलमधून घरी तर आला होता पण असह्य वेदना तर होत्याच. पण त्याने मनाशी पक्के ठरविले की या संकटातून पार होण्यासाठी स्वत:च प्रयत्न करायचे. कोणीहि असे म्हणता कामा नये की टेरी मैदान सोडून पळाला! रिक हानसेन व्हील चेअरवर बसून बास्केटबाॅल खेळत असत. त्यांच्या सांगण्यावरून टेरीने उन्हाळ्यात व्हील चेअर वरून बास्केटबाल खेळण्यास सुरवात केली.



हानसेन म्हणाला की, टेरीने खूप मेहेनत घेतली. तो नेहमी 'फर्श' वर अभ्यास करीत असे पुढच्याच वर्षी टेरी आणि त्याच्या टिमने वैंकेवर केबलकार्सने कॅनडियन चँपिअन जिंकली. नंतर टेरीने धावायला सुरवात केली. त्याने दैगला मार्गदर्शन करण्याची विनंती केली. दौग म्हणाला, ‘सुरवात एका फेरीने कर'. नंतर दौगच्या सांगण्यानुसार टेरी हळूहळू फेरी वाढवत गेला. 1979 मधे कामगार दिनी टेरीने प्रिंस जॉर्ज पासून बोस्टन 17 मैलाच्या लांब पल्ल्याच्या मॅरेथानमधे भाग घेतला. 3 तास 19 मिनिटांनंतर तो सर्वात शेवटच्या क्रमांकावर होता. तरी पण टेरी समाधानी होता. त्याचा उत्साह वाढला होता.

आता टेरी लांब पल्ल्याच्या स्पर्धेसाठी तयार झाला होता. रोजच्या सरावामधे तो 5000 कि.मि. पेक्षा जास्त धावला होता.



रोजच्या सरावाने टेरीची सहनशक्ती व ताकद चांगलीच वाढली होती.

टेरीने मदत मिळविण्यासाठी लोकांना पत्रे लिहिली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. 'आदिदास' कंपनीने त्याला धावतांना घालण्यासाठी बूट दिले. फोर्ड कंपनीने गाडी दिली. जी दौग चालवत असे. इतर कंपन्यानीही पैसे व काही सामान दिले. आता टेरी कॅनडामधील दौडीसाठी सज्ज झाला होता.

टेरी फाक्सची "मॅरेथान आफ होप", सेंट जान, न्यू फाउंडलँड पासून 12 एप्रिल 1980 रोजी सुरू झाली. सीबीसी ने टेरीची दौड चित्रित केली. टेरीने आपला कृत्रिम पाय ॲटलांटिक महासागरांत बुडवून टाकला आणि दौड सुरू केली.



मॅरेथान आफ होप मधे धावतांना टेरी लोकांना अभिवादन करीत आहे

टेरी नोवा स्कोटिया,प्रिंस एडवर्ड आइसलँड आणि न्यू ब्रून्सविक या भागातून धावत होता .....कॅनडातील सर्व लोकांनी त्याला टीव्हीवर बघितले. न्यू ब्रुन्सविकमधे त्याचा भाऊ डारेलही त्याच्याबरेबर धावला. "त्याच्या चेहर्यावरचे प्रसन्न भाव आजही मला सर्वात जास्त आठवतात" टेरीबद्दल बोलतांना डेरेलने सांगितले. पूर्ण देशावर याचा खूप परिणाम झाला. मान्ट्रियल, क्यूबैक मधील उद्योगपती इसडोर शार्प यांनी टेरीसाठी निधी जमा केला.

लहान लहान मुलांनी नाणी दान केली. लोकांनी टेरीचा उत्साह वाढविला. ओंटारियो प्रदेशातून टेरीची दौड सुरू होती तेव्हा पूर्ण कॅनडा दौडीमधे सामिल झाला. टेरीच्या मनात आले की प्रत्येक कॅनडिअनने 1 डालर दान केला तरी खूप मदत होईल. त्याने आपल्या भाषणात जाहिर केले की फक्त 1 डालर दान करून तुम्ही "मॅरेथान आफ होप" मधे सहभागी होऊ शकाल.



मॅरेथान आफ होप मधे धावतांना टेरीचा झिजलेला बूट


टेरी तरूण मुलांच्या जीवनाच्या खूप जवळ गेला होता. उत्तर ओंटारियामधे त्याने 10 वर्ष ग्रेग स्कॅट बरोबर घालविली.कर्करोगामुळे त्याचाहि पाय कापला होता.

थंडर-बेमधे पोहोचल्यावर टेरीला खोकल्याने हैराण केले. त्याचे डोकेही भयंकर दुखायला लागले. त्याने दौगला त्याला हास्पिटलमधे घेऊन जायला सांगितले. हास्पिटलमधे सर्व तपासण्या झाल्यावर लक्षात आले की कर्करोग टेरीच्या फुफ्फुसांत पसरला आहे. रोल्ली आणि बेट्टी फा ॅक्स ओंटारियाला येऊन टेरीला उपचारार्थ घरी घेऊन गेले.



मॅरेथान आफ होप – मार्ग

12 एप्रिल 1980 ते 1 सप्टेंबर 1980





या 143 दिवसात टेरी 5374 कि मी धावला. त्याने मॅरेथान पूर्ण करण्याचा निश्चय केला होता. "मी प्रतिज्ञा केली आहे आणि मी ती पूरी करणारच!" टेरीने त्या दिवशी, कॅनडातील लोकांना उद्देशून, टेलीव्हिजन वरून केलेल्या भाषणात सांगितले. "जे काही मी केले आहे त्यामुळे लोकांना स्फूर्ती मिळेल."

टेरी खरोखरीच एक प्रेरणा स्त्रोत होता. दुसर्याच दिवशी "इसाडोर शार्प" या संस्थेने टेलिव्हिजन वरून लोकांशी संपर्क साधला व जाहिर केले की ते "टेरी फाक्स" या नावाची संस्था स्थापन करतील व संस्थेतर्फे दर वर्षी अशाच प्रकारची "दौड" आयोजित करण्यात येईल. 7 सप्टेंबर रोजी टेरीने सीटिव्ही वर हा कार्यक्रम पाहिला. त्यावेळी तो हाॅस्पिटलमधे केमोथेरपी उपचार घेत होता.

एका दिवसात 1 करोड डालर्सपेक्षा जास्त निधी जमा झाला.एव्हढेच नाही तर हजारो लोकांनी टेलीग्रामस् पाठविले. ठीकठिकाणी गायन, नृत्य असे कार्यक्रम आयोजित करून निधी जमविण्यात आला. 1981 पर्यंत 2.4 कोटी डालर्स जमा झाले.टेरी सर्वासाठी एक प्रेरणा स्त्रोत ठरला होता.

नंतर काही महिने टेरी फाक्सला जगण्यासाठी खुप संघर्ष करावा लागला.काही दिवसासाठी तो हास्पिटलमधून घरी आला. त्याने मनापासून "मॅरेथान आफ होप" पूर्ण करण्याचे स्वप्न बाळगले होते. पण 28 जून 1981 रोजी सर्व परिवार आजूबाजूला असताना टेरीची प्राणज्योत मालविली. टेरीच्या सन्मानार्थ कॅनडामधे झेंडा खाली झुकविला गेला. कोकुइतलम स्मशानात टेरीचे दफन करण्यात आले.टेरीवर मनापासून प्रेम करणारे सर्व अतिशय दु:खी झाले.



थंडर बे जवळील टेरी फॉक्सचा पुतळा! याच जागेपासून टेरीची "दौड" थांबली.)



टेरी फॉक्स उत्तर ऑंटारियो येथिल ट्रांस केनेडियन हायवे वरून धावतांना....त्याच्यामागे पोलिसांची गाडी आहे.)

आपल्या अल्पशा जीवनात टेरी फॅक्सला अनेक मानसन्मान मिळाले."चँपियन आफ द केनेडिअन आर्डर" हा किताब मिळविणारा टेरी सर्वात तरूण व्यक्ति होता. ब्रिटिश कोलंबियाचे सर्वोच्च पदक, " आर्डर आफ द डागवुड" टेरीला मिळाले. टेरीच्या मृत्युनंतर, मैदाने, स्मारके, शाळा इतकेच नाही तर बर्फ फोडणार्या एका जहाजालाही त्याचे नाव देण्यात आले. 1999 मधे केलेल्या निरीक्षणामधून दिसून आले की कॅनडामधील लोकांचा टेरी महानायक होता.

टेरीच्या मृत्युनंतर दर सप्टेंबरमधे पूर्ण जगांत "टेरी फाक्स रेसर्च" आयोजन होते. टेरी फाक्स फाऊंडेशनने कर्करोग संशोधनासाठी करोडो डालर्स उपलब्ध करून दिले आहेत. टेरी फॉक्स ने लिहून ठेवले आहे, " ही वेदना समूळ नष्ट व्हायलाच हवी. जोपर्यंत ती नष्ट होत नाही तोपर्यंत कॅनडाची 'मॅरेथान आफ होप' चालू राहिल."